सकाळ 13-3-04



ताराराणी विद्यापीठात शुक्रवारी तुकाराम बिजनिमित्त 'तुका आकाशा येवढा' या विषयावर बोलताना प्राचार्य इंद्रजित देशमुख. शेजारी प्राचार्य क्रांतिकुमार पाटील, माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर व अनिल कदम.

## ताराराणी विद्यापीठात तुकाराम बीज सप्ताह

**कोल्हापूर, ता. १२ :** ताराराणी विद्यापीठाच्या शारदा मंदिरामध्ये तुकाराम बीज सप्ताह झाला. प्राचार्य इंद्रजित देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर होते.

श्री. देशमुख म्हणाले, "संत तुकारामांनी केलेले कार्य हे दीपस्तंभासारखे आहे. तुकारामांचे जीवनाविषयीचे तत्त्वज्ञान सर्वसामान्यांना जीवनाची दिशा देत आहे."

सौ. जयश्री पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सौ. भारती शेळके यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, संस्थेच्या उपाध्यक्षा राजलक्ष्मी जाधव आदी उपस्थित होत्या. सौ. अंजली साठे यांनी आभार मानले.